# ASO - मुख्य परीक्षा - 2012
## पेपर 1
## मराठी व इंग्रजी

1. **खालीलपैकी अचूक शब्द निवडा.**
(1) पारंपारिक (2) परंपारिक
(3) पारंपरिक (4) पारंपरीक

2. **'शुभ-पवित्र-शिव' म्हणजे**
(1) मंगल (2) चांगले (3) प्रेयस (4) चांगल

3. **धारवाडी काटा म्हणजे**
(1) धारवाडहून आणलेला वजन काटा
(2) पायात बोचलेला विशिष्ट काटा
(3) बिनचूक वजनाचा काटा
(4) कान टोचण्याचे एक साधन

4. **'जे खळांची व्यंकटी सांडो' यातील अधोरेखित खळ शब्दाचा अर्थ काय?**
(1) खलबल (2) धोरण
(3) खड्डा (4) दुर्जन

5. **पुढीलपैकी परदेशी शब्द कोणते?**
(1) गुडगा, लुगडे, ढेकूण
(2) परंतु, विनंती, काळजी
(3) टेबल, बटाटा, पोशाख
(4) कळस, किळस, आळस

6. **'भंग' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द सांगा.**
(1) भग्न (2) निर्भंग (3) सभंग (4) अभंग

7. **'लिहिण्याची हातोटी' या शब्दसमूहासाठी योग्य पर्याय निवडा.**
(1) व्यक्तिगत शैली (2) लेखनकला
(3) लेखनशैली (4) लेखनविषय

8. **'हलकी वाहने डाव्या बाजूने न्या' अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?**
(1) फुलकी (2) अवजड
(3) जडशील (4) जडशीर

9. **'अजर' म्हणजे**
(1) ज्याला कधीही मरण येत नाही तो
(2) अजगराप्रमाणे सुस्त पडणारा
(3) ज्याला कधीही म्हातारपण येत नाही असा
(4) म्हातारपण लांबविणारे औषध

10. **'आवक' या शब्दाला विरुद्धार्थी शब्द सांगा.**
(1) श्रावक (2) भावक
(3) जावक (4) वाहक

11. **खालीलपैकी अयोग्य पर्याय निवडा.**
(1) शुक्लपक्ष = वद्य पक्ष
(2) सधवा = पती हयात असलेली स्त्री
(3) मनकवडा = मनातील ओळखणारा
(4) विधुर = पत्नी हयात नसणारा

12. **'सांगोपांग' या शब्दातून नेमकेपणाने व्यक्त होणारा अर्थ काय?**
(1) यथासांग (2) सांगयथा
(3) सांगकथा (4) तुटकतुटक

13. **योग्य शब्द निवडा**
(1) अल्पसंख्याक (2) अल्पसंख्यांक
(3) अल्पसख्यांक (4) अप्लसंख्यांक

14. **'श्रीमंत माणसे अतिशय चैनबाजी करतात' या वाक्यातील अधोरेखित वाक्यखंडासाठी अचूक शब्द निवडा.**
(1) वारेमाप खर्च करणे (2) पैसा उधळणे
(3) जिवाची मुंबई (4) मुंबईचा जीव

15. **अली, मधुप, मिलिंद म्हणजे**
(1) डोंगर (2) भ्रमर
(3) मकरंद (4) मधमाशी

16. **'घड्याळाने पाच वाजल्याचे दर्शविले' या वाक्यातील शब्दशक्ती ओळखा.**
(1) अभिधा (2) लक्षणा
(3) लाक्षणिक (4) व्यंजना

17. **पतिपत्नीस एकत्र जेवावयास बोलावले तर त्यांस ....... म्हणतात.**
(1) युगल (2) मेहूण
(3) नरमादी (4) स्त्री-पुरुष

18. **खालीलपैकी सिद्ध शब्द ओळखा.**
(1) येऊन (2) ये (3) येओ (4) येणार

19. **खालील शब्दांतून वस्त्र व आकाश अर्थ असलेला शब्द निवडा.**
(1) नभ (2) गगन् (3) पट (4) अंबर

The UNIQUE academy

20. **कवि, मधु, गुरु, पुत्र, कन्या हे शब्द कोणत्या प्रकारातील आहेत?**
(1) तत्सम (2) तद्भव
(3) फारसी (4) अरबी

21. **'प्रार्थना' हा शब्द कोणत्या प्रकारात मोडतो?**
(1) उपसर्गघटित (2) प्रत्ययघटित
(3) सिद्ध (4) सामाजिक

22. **खालीलपैकी 'देशी' शब्द ओळखा.**
(1) लुगडे (2) आटा (3) बटाटा (4) खाना

23. **अभ्यस्त शब्द म्हणजे**
(1) सामासिक शब्द (2) तद्भव शब्द
(3) द्विरुक्त शब्द (4) तत्सम शब्द

24. **खालीलपैकी कोणता शब्द इंग्रजी भाषेतून आला आहे?**
(1) पार्सल (2) मार्शल
(3) बटाटा (4) तंबाखू

25. **ज्या समासात द्वितीय पद प्रधान असते त्याला.....समास म्हणतात.**
(1) द्वन्द्व समास (2) कर्मधारय समास
(3) तत्पुरुष समास (4) यापेक्षा वेगळे उत्तर

26. **'मेहनत' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे?**
(1) अरबी (2) फारसी (3) इंग्रजी (4) संस्कृत

28. **'जमाव' या शब्दातील 'ज' हा वर्ण कोणत्या प्रकारचा आहे?**
(1) तालव्य (2) मूर्धन्य
(3) दंततालव्य (4) कंठतालव्य

29. **खालील शब्दांतील अभ्यस्त नसलेला शब्द ओळखा.**
(1) जिकडेतिकडे (2) आंबटचिंबट
(3) किरकीर (4) दगडबिगड

30. **'खालीलपैकी कंठ्यवर्ण' कोणता?**
(1) छ् (2) अ (3) ङ् (4) र

31. **शब्द उच्चारल्याबरोबर विशिष्ट वस्तू-पदार्थ डोळ्यासमोर येतो. ती शब्दशक्ती म्हणजे**
(1) लक्षणा (2) व्यंजना (3) निरूढा (4) अभिधा

32. **खालीलपैकी 'मूर्धन्य वर्ण' कोणता ?**
(1) छ (2) ब (3) क (4) द्

33. **जोडअक्षर म्हणजे काय? किंवा जोडाक्षराचे समीकरण लिहा, किंवा जोडाक्षर म्हणजे**
(1) दोन किंवा अधिक व्यंजने + स्वर
(2) अक्षर + अक्षर
(3) स्वर + व्यंजन
(4) व्यंजन + व्यंजन

34. **क्षुध + पीडा' याची योग्य संधी कोणती?**
(1) क्षुत्पीडा (2) क्षुतपीडा
(3) क्षुत्पिडा (4) क्षुत्‌पिडा

35. **'ए' हा स्वर कोणत्या प्रकारात मोडतो?**
(1) विजातीय स्वर (2) संयुक्त स्वर
(3) दीर्घ स्वर (4) व्यंजनयुक्त स्वर

36. **'जगज्जननी' या शब्दाचा योग्य विग्रह कोणता?**
(1) जगज्ज + ननी (2) जग + अननी
(3) जगत् + जननी (4) जग + जननी

37. **'जनाबाई' या शब्दातील 'ज' चा उच्चार ....... आहे.**
(1) दन्तमूलीय (2) तालव्य
(3) दन्त्य (4) मूर्धन्य

38. **लिपीचा शोध लागल्याने आपल्याला काय शक्य झाले आहे?**
(1) वाचन (2) लेखन (3) मनन (4) चिंतन

39. **दिक् + पाल = दिक्पाल हा संधीप्रकार कोणता?**
(1) व्यंजनसंधी (2) स्वरसंधी
(3) अनुनासिक संधी (4) विसर्ग संधी

40. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा ''नुसती हुशारी काय कामाची?''**
(1) विशेषण
(2) गुणधर्मदर्शक भाववाचक नाम
(3) सामान्य नाम
(4) विशेष नाम

41. **देवनागरी लिपी असणाऱ्या भाषा कोणत्या?**
(1) मराठी, गुजराथी, हिंदी, संस्कृत
(2) मराठी, हिंदी, इंग्रजी, कानडी
(3) मराठी, तेलगू, हिंदी, संस्कृत
(4) मराठी, कानडी, गुजराथी, बंगाली

42. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा 'वानर' वडावर चढले.**
(1) भाववाचक (2) विशेषनाम
(3) सामान्यनाम (4) धातुसाधित नाम

43. **विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागताा नामाचे सर्वनामाचे जे रूप बदलते, त्याला ....... म्हणतात.**
(1) विशेष रूप (2) प्रकृतिरूप
(3) सामान्यरूप (4) विभक्तिरूप

44. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा. 'कुठे आहे तो भामटा? तो बघा पळाला'**
(1) दर्शक सर्वनाम (2) संबंध सर्वनाम
(3) आत्मवाचक सर्वनाम (4) सामान्य सर्वनाम

**45. योग्य विधान निवडा.**
(1) विशेषण हे विशेष्याच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलते.
(2) विशेषण हे अविकारी आहे.
(3) विशेषण हे अव्यय आहे.
(4) क्रियाविशेषण हे नामाला लागते.

**46. 'लुच्चेगिरी' या शब्दाचे लिंग कोणते?**
(1) नपुंसकलिंगी (2) उभयलिंगी
(3) स्त्रीलिंगी (4) पुल्लिंगी

**47. खालील शब्दांपैकी ....... हे भाववाचक नाव नाही.**
(1) शांत (2) नवलाई (3) समता (4) धैर्य

**48. 'गाय' या शब्दाचे इकारान्त अनेकवचन लिहा.**
(1) गाया (2) गायी (3) गाई (4) गाए

**49. स्वार्थापोटी सत्कार्यालाही माणसे विरोध करतात. यात अधोरेखित ही हे ....... आहे.**
(1) सर्वनाम (2) उभयान्वयी अव्यय
(3) शब्दयोगी अव्यय (4) प्रत्यय

**50. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचा विशेषण प्रकार ओळखा.**
**तिला <u>बनारसी</u> साडी शोभून दिसते.**
(1) नामसाधित विशेषण (2) सार्वनामीक विशेषण
(3) समासघटित विशेषण (4) संबंधी विशेषण

**51. क्रियापद म्हणजे .......**
(1) केवळ क्रियादर्शक शब्द
(2) क्रियेबद्दल माहिती सांगणारा शब्द
(3) क्रिया संपविणारा शब्द
(4) वाक्य पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द

**52. अधोरेखित शब्दाचा विशेषणाचा प्रकार ओळखा 'राम एकवचनी राजा होता'.**
(1) नामसाधित विशेषण (2) गुणविशेषण
(3) सर्वनामिक विशेषण (4) समासघटित विशेषण

**53. 'झाड पाडले' या वाक्यात पाडले' या क्रियापदाचा प्रकार ओळखा.**
(1) संयुक्त क्रियापद (2) प्रयोजक क्रियापद
(3) अनियमित क्रियापद (4) शक्य क्रियापद

**54. 'वादळात झाड सापडले' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार सांगा.**
(1) अकर्मक क्रियापद (2) सकर्मक क्रियापद
(3) अकर्व्हक क्रियापद (4) साहाय्यक क्रियापद

**55. 'सुरेश गीत गात होता' काळ ओळखा.**
(1) पूर्ण भूतकाळ (2) अपूर्ण भूतकाळ
(3) चालू भूतकाळ (4) सामान्य भूतकाळ

**56. 'मी निबंध लिहितो' अपूर्ण भविष्यकाळ करा.**
(1) मी निबंध लिहिणे
(2) मी निबंध लिहित जाईन.
(3) मी निबंध लिहित असेन.
(4) वरील एकही पर्याय योग्य नाही.

**57. अचूक वाक्य ओळखा.**
(1) सर्वच क्रियाविशेषणे अव्यय असतात.
(2) कांही क्रियाविशेषणे विकारीही असतात.
(3) क्रियाविशेषणे ही एकाक्षरी नसतात.
(4) क्रियाविशेषणे ही क्रियेच्या कर्त्याविषयी माहिती देतात.

**58. खालील वाक्यातील विशेषणांचा प्रकार ओळखा.**
**'माझा आनंद द्विगुणित झाला'.**
(1) पृथकत्ववाचक संख्याविशेषण
(2) अनिश्चित संख्याविशेषण
(3) आवृत्तीवाचक संख्याविशेषण
(4) सार्वनामिक विशेषण

**59. कोणते शब्दयोगी अव्यय लावताना शब्दाचे सामान्यरूप होत नाही?**
(1) मुळे (2) पैकी (3) मध्ये (4) च्

**60. 'पाऊस <u>सगळीकडे</u> पडला बरं का' अधोरेखित क्रियाविशेषणाचा प्रकार सांगा.**
(1) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय
(2) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय
(3) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय
(4) परिणामदर्शक क्रियाविशेषण अव्यय

**61. 'मधूला गोरी <u>नि</u> शिकलेली वधू पाहिजे' या वाक्यातील '<u>नि</u>' हे अव्यय कोणते?**
(1) विकल्प बोधक (2) समुच्चय बोधक
(3) परिणाम बोधक (4) न्यूनत्व बोधक

**62. खालील अधोरेखित शब्दाचा क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**'पाणी <u>गटागटा</u> पिऊ नकोस'**
(1) परिणामदर्शक क्रियाविशेषण अव्यय
(2) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय
(3) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय
(4) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

**63. शुद्धलेखन नियमांनुसार शुद्ध शब्द निवडा.**
(1) मंदीर (2) अनील (3) कीडा (4) गुण

**64. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**
**'<u>घरापुढे</u> मोठे अंगण आहे.'**
(1) उभयान्वयी अव्यय (2) केवलप्रयोगी अव्यय
(3) शब्दयोगी अव्यय (4) क्रियाविशेषण अव्यय

65. 'आमच्या संघाने स्पर्धा जिंकली.' या वाक्यात विधेय कोणते?
(1) स्पर्धा जिंकली (2) आमच्या संघाने
(3) स्पर्धा (4) जिंकली

66. 'वर', 'खाली', 'समोर' हे कोणत्या जातीचे शब्द आहेत?
(1) उभयान्वयी अव्यय (2) क्रियाविशेषण अव्यय
(3) केवलप्रयोगी अव्यय (4) शब्दयोगी अव्यय

67. व, पण, किंवा आणि या अव्ययांनी जोडलेले वाक्य हे ....... असते.
(1) मिश्र वाक्य (2) केवलवाक्य
(3) संयुक्त वाक्य (4) गौणवाक्य

68. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात कोणती?
'तुला पन्नास रुपये दिले, आणखी काय देऊ?'
(1) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
(2) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
(3) प्रधानसूचक उभयान्वयी अव्यय
(4) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

69. 'जर चांगला अभ्यास केला तर उत्तम यश मिळेल' हा ........ वाक्य प्रकार आहे.
(1) मिश्र वाक्य (2) संकेतार्थी वाक्य
(3) आज्ञार्थी (4) विध्यर्थ

70. खालील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.
'गडी-माणसांचीच तेवढी अडचण आहे, बाकी सर्व ठीक आहे.'
(1) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय
(2) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
(3) कारणदर्शक उभयान्वयी अव्यय
(4) संकेतदर्शक उभयान्वयी अव्यय

71. योग्य जोडी निवडा
(1) उद्देश्य = कर्म (2) उद्देश्य = क्रियापद
(3) उद्देश्य = कर्ता (4) उद्देश्य = विधेय

72. 'आम्ही हाच साबण वापरतो. कारण की तो स्वदेशी आहे'. अधोरेखित शब्दाचा अव्यय प्रकार सांगा.
(1) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय
(2) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
(3) कारणदर्शक उभयान्वयी अव्यय
(4) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय

73. 'वाईट काम करू नका' या वाक्याचे होकारार्थी वाक्य बनवा.
(1) चांगले काम करा (2) वाईट काम करा
(3) चांगले काम करू नका (4) यापैकी नाही

74. 'वाघ' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप ओळखा.
(1) वाघिण (2) वाघिन (3) वाघ्रीन (4) वाघीण

75. 'अगोदर स्त्रियांना आत जाऊ द्यावे.' हे वाक्य-
(1) विधानार्थी आहे (2) आज्ञार्थी आहे
(3) इच्छार्थक आहे (4) मिश्रवाक्य आहे

76. 'सुतार' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप ओळखा
(1) भ्रतार (2) सुतारीण (3) लोहार (4) होलार

77. वाक्य पृथक्करण म्हणजे
(1) वाक्यातील शब्दांचा परस्परसंबंध स्पष्ट उलगडणे
(2) दोन वाक्ये वेगवेगळी करणे
(3) दोन वाक्ये एकमेकांना जोडणे
(4) वाक्य शुद्ध करून लिहिणे

78. 'वानर' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप ओळखा.
(1) माकड (2) वानरी
(3) माकडीण (4) बोका

79. 'फळे गोड निघाली' या वाक्यातील विधेय पूरक ओळखा.
(1) फळे (2) गोड फळे
(3) गोड (4) निघाली

80. खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.
'मांजराकडून उंदीर मारला गेला'.
(1) प्रधानकर्तृक कर्मणि प्रयोग
(2) भावे प्रयोग
(3) कर्मणि प्रयोग
(4) कर्तरी प्रयोग

81. मुसळधार पाऊस पडला – उद्देश्यविस्तार ओळखा.
(1) मुसळधार (2) पाऊस
(3) पडला (4) पाऊस पडला

82. खालील वाक्यातील प्रयोग ओळखा
'सहलीस जाताना कात्रजजवळ उजाडले.'
(1) कर्मभाव संकर प्रयोग
(2) मिश्र किंवा संकर प्रयोग
(3) भावकर्तरि प्रयोग
(4) कर्म-कर्तृ प्रयोग

83. सुरेशने सुरेल गाणे म्हटले – कर्मविस्तार सांगा
(1) म्हटले (2) गाणे (3) सुरेल (4) सुरेश

84. दोन शब्द जोडताना कोणते विरामचिन्ह वापरतात?
(1) योग्य चिन्ह (2) संयोग चिन्ह
(3) योग चिन्ह (4) अर्ध विराम

85. वेदश्री चित्रे काढीत आहे – काळ ओळखा.
(1) अपूर्ण वर्तमान काळ (2) पूर्ण वर्तमान काळ
(3) रीती वर्तमान काळ (4) उद्देश्य वर्तमान काळ

86. **खालील वाक्यामध्ये योग्य उद्‌गार चिन्ह वापरलेले वाक्य कोणते?**

(1) आहेत छान किती फुले !

(2) फुले किती छान आहेत !

(3) छान ! किती फुले आहेत !

(4) अय्या ! किती छान फुले आहेत !

87. **वाक्य संश्लेषन म्हणजे**

(1) वाक्य पृथक्करण (3) वाक्य संयोजन

(2) वाक्य अन्वेषण (4) वाक्यानुसंधान

88. **''न्यायाधिशाकडून दंड करण्यात आला'' या प्रयोगाचे नाव सांगा.**

(1) कर्तरी प्रयोग (2) भावे प्रयोग

(3) समापन कर्मणी प्रयोग (4) नवीन कर्मणी प्रयोग

89. **एकाने माणसे मोजून पाहिली ती नऊच भरली – संयुक्त वाक्य करा**

(1) एकाने माणसे मोजून पाहिली पण ती नऊच भरली.

(2) एकाने माणसे मोजून पाहिल्याबरोबर ती नऊच भरली.

(3) नऊ माणसे भरल्यामुळेच ती एकाने मोजून पाहिली.

(4) एकाने माणसे मोजली आणि ती नऊच भरली.

90. **खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.**

(1) बलिष्ट (2) बलीष्ट

(3) बलिष्ठ (4) भलिष्ट

91. **चुकीचा अर्थ असलेला वाक्प्रचार निवडा.**

(1) निगराणी करणे = काळजी करणे

(2) भ्रमनिरास होणे = वास्तवाची कल्पना येणे

(3) डोळे लावून बसणे = डोळे मिटवून बसणे

(4) मंत्रमुग्ध होणे = भारावून जाणे

92. **'पण मन <u>बेटे</u> स्वस्थ राहिना' या वाक्यातील अधोरेखित 'बेटे' या शब्दातील उद्गारवाची अव्ययाचा प्रकार सांगा.**

(1) व्यर्थउरवाची (2) संमती वाचक

(3) संबोधन दर्शक (4) हर्षदर्शक

93. **'बोल लावणे' या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ लिहा.**

(1) अंगास लावणे

(2) दोष देणे

(3) बोलास बोल लावणे

(4) बोलून भांडण लावणे

94. **मुख्य वाक्यास दुसरे पर्यायी नांव काय?**

(1) प्रमुख (2) प्रधान

(3) गौण (4) अगौण

95. **दिलेल्या वाक्समूहातून म्हण शोधा**

(1) सापाला दूध पाजणे (2) जिभेला हाड नसणे

(3) वरातीमागून घोडे (4) धारातीर्थी पडणे

96. **मला ताप आला आहे, मी शाळेस येणार नाही. (केवल वाक्य करा)**

(1) ताप आला शाळेस कशाला जाऊ?

(2) मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही.

(3) मला ताप आल्यामुळे शाळेस जाणे बरे नव्हे.

(4) शाळेला जाणार नाही कारण ताप आला आहे.

97. **'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' म्हणजे**

(1) आपल्या माणसांच्या नाशास आपणच कारण.

(2) कुऱ्हाडीचा दांडा काळा असावा.

(3) पैसा असेपर्यंतच लोक मान देतात.

(4) यापैकी नाही.

98. **नामवाक्य, विशेषणवाक्य, क्रियाविशेषण वाक्य हे कोणत्या वाक्याचे प्रकार आहेत?**

(1) गौण वाक्याचे

(2) प्रधान वाक्याचे

(3) पैसा असेपर्यंतच लोक मान देतात

(4) नाम वाक्याचे

99. **सांबाच्या पिंडीते बससी अधिष्ठूनि वृश्चिका आज । यांतून प्रगट होणारी म्हण –**

(1) विंचवाचे बिहाड पाठीवर

(2) तुका म्हणे विंचवाची नांगी ।
तैसा दुर्जन सर्वांगी ।।

(3) लेकी बोले सुने लागे

(4) गुरुची विद्या गुरुला

100. **'तो नेहमीच लवकर येतो' या वाक्यातील काळ ओळखा.**

(1) वर्तमान काळ (2) अपूर्ण वर्तमान काळ

(3) पूर्ण वर्तमान काळ (4) रीतिवर्तमान काळ

101. **'घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात.' ही म्हण ....... इथे उपयुक्त आहे.**

(1) राजूची नोकरी गेल्यामुळे त्याच्याशी कोणीही नीट वागत नव्हते.

(2) राजूने त्याच्या घराची दिशा बदलली.

(3) घोर संकट आले की थोडीशी मदतही महत्त्वाची ठरते.

(4) यापैकी नाही.

102. **'काम न करता परत येणे' या अर्थाचा वाक्प्रचार कोणता?**

(1) हात मारणे (2) हातावर पोट मारणे

(3) हाती पायी सुटणे (4) हात टालवित परत येणे

103. **कृष्णाचे वडील आजारी पडले, त्यातच त्याच्या आईचा पाय मोडला. म्हणतात ना!**

(1) आई जेवू घालीना अन् बाप भीक मागू देईना

(2) इकडे आड तिकडे विहीर

(3) दुष्काळात् तेरावा महिना
(4) घरचे झाले थोडे अन् व्यायाने धाडले घोडे

**104. 'जीवाचे रान करणे' समानार्थी वाक्प्रचार सांगा.**
(1) हाडाची काडे करणे (3) हाड मोडून पडणे
(2) हाड शिजविणे (4) हाडाचे पाणी करणे

**105. नाविक शब्दाचा विग्रह करा.**
(1) नौ + इक = नाविक
(2) ना + विक = नाविक
(3) नाव + इक = नाविक
(4) नावी + क = नाविक

**106. 'नाकी नऊ येणे' या वाक्प्रचाराचा योग्य उपयोगासाठी खालील पर्यायातून अचूक वाक्य लिहा.**
(1) आवडता पदार्थ मिळाल्यावर नाकी नऊ येतात.
(2) रात्र आठवल्यावर नाकी नऊ येते.
(3) लाईट गेल्यावर नाकासमोर बघून चालणे.
(4) कर्जबाजारी झाल्याने संपतरावाच्या नाकी नऊ आले.

**107. कोणत्याही क्षेत्रात हळूहळू होणारा बदल म्हणजे.**
(1) क्रांती (2) परिवर्तन
(3) परावर्तन (4) उत्क्रांती

**108. 'ज्या माणसाजवळ विद्वता बेताचीच असते तो खूप बढाया मारताना आढळतो.पण ज्याच्याजवळ सखोल ज्ञान असते तो शांत असतो'. यासाठी योग्य अर्थाची म्हण सांगा.**
(1) असंत कणंबर पण बढाया मारणे
(2) विद्वान सर्वच पूज्यते
(3) विद्वानाला बढाया माराव्याच लागतात.
(4) उथळ पाण्याला खळखळाट फार

**109. शेवटी ती वेल वाळून गेली. हे उदाहरण ....... प्रयोगाचे आहे.**
(1) कर्मणी (2) कर्तरी
(3) भावे (4) सकर्मक कर्मणी

**110. 'क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तूंना भाळतात' या वाक्यासाठी योग्य अर्थाची म्हण लिहा.**
(1) हलक्या माणसांना कसे वागावे कळत नाही.
(2) कोल्हा काकडीला राजी
(3) क्षुद्र म्हणजे पैसे देवून वस्तू घेवू शकत नाहीत.
(4) क्षुद्रांना वस्तू फार प्रिय असतात.

**Q.No. 111 ते 115 :**

'संस्कृति' म्हणजे त्या त्या देशाची, त्या मानवसमूहाची, समाजपुरुषाची खरी ''संपन्नता'' होय. हर एक देशांत एक ''सद्गुणसमूह' असतो. तो 'सद्गुण-समूह' च त्या देशाची 'संस्कृति' बनवीत असतो. त्या संस्कृती' प्रमाणे त्या त्या देशवासीयांची जडण-घडण होऊन तीच त्यांची 'अस्मिता' जागृत राहते, अर्थात् त्यारूपाने स्वदेशाभिमान' जागृत राहात असतो. यांतील भाव असा की, सत्संस्कारमूलक-चांगल्यासंस्कारपूर्वक ज्या ज्या 'सत्कृति' चांगल्या कृति, सात्त्विक कृति झाल्या, त्या त्या सत्-कृतीवद्दल त्या त्या आजूबाजूच्या मानवसमाजाच्या मनीं - मानसीं आदरभाव निर्माण होतो. त्यांतूनच हळूहळू विशिष्ट अशी 'संस्कृति' बनत असते. किंबहुना ! ती 'संस्कृति' हेच त्या देशाचे 'भूषण-स्थान' होय. केवळ उत्तुंग इमारतींचे, रमणीय उपवनांचे महावनांचे, सुशीतल मोठ्या जलाशयाचे वा विस्तीर्ण अशा भूभागाचे 'रक्षण' म्हणजे 'स्वदेशरक्षण', असे मुळीच नव्हें; तर उपर्युक्त स्वरूपाच्या 'संस्कृती' चे रक्षण म्हणजे खरे व उचित देशाचे रक्षण होय; समाजपुरुषाचे, लोकसंस्थेचे रक्षण होय. किंबहुना ! आपल्या संस्कृतीच्या, मानवी-अस्मितेच्या, मानवी 'जीवनमूल्यांच्या रक्षणार्थच देशाचे व देशांतील इतर निसर्गदत्त व स्वोपार्जित सर्वपदार्थांचे, भोगसमृद्धीचे रक्षण करावे लागते, म्हणजेच मानव समाजांत सद्गुण समूह, जीवनमूल्ये ही नांदतात आणि त्यामुळे मानवाचे-मानवसमूहाचे जीवन बेरंग, बेचैन आणि दुखरे बनत नाही.

**111. संस्कृती म्हणजे**
(1) अस्मिता
(2) चांगल्या गुणांचा संचय
(3) देशांतील सर्व बरे वाईट संस्कार
(4) देशातील रीतिरिवाज

**112. देशरक्षण म्हणजे**
(1) देशातील भोगसमृद्धीचे रक्षण
(2) चतुःसीमा संरक्षित करणे
(3) परकीय शक्तींचा बिमोड करणे
(4) देशातील सद्गुण समूहाचे रक्षण

**113. लेखकाच्या मतानुसार अस्मिता म्हणजे**
(1) देशातील उत्तुंग इमारती, उपवने इ.
(2) स्वदेश संस्कृती अभिमान
(3) देशातील जलाशये
(4) देश ध्वज

**114. मानवाचे जीवन दुखरे, बेरंग, बेचैन कशामुळे बनते?**
(1) असद्गुण समूहामुळे
(2) जीवनमूल्यामुळे
(3) संस्कृती व जीवनमूल्यांच्या अभावात
(4) भोगसमृद्धी, रमणीय उपवने कमी झाल्यास

**115. सदर उताऱ्यास योग्य शीर्षक द्या**
(1) जीवनमूल्य
(2) सांस्कृतिक संचित
(3) संस्कृति रक्षण
(4) संस्कृतीसमन्वय

**पुढील उत्तारा वाचून त्या खालील प्रश्न क्र. 116 ते 120 ची उत्तरे लिहा :**

या देशाचे प्राचीन संस्कृत नांव आर्यावर्त किंवा भरतखंड असे आहे. परंतु तार्तर देशांतून जे मोंगल मुसलमान लोक जिंकण्याकरितां हिंदुस्थानांत शिरले होते, त्यांस हे लोक काळे असे भासलें म्हणून त्यांनी तद्वाचक हिंदु असें नांव त्यास दिलें व त्यामुळे हिंदुस्थान हेंही नांव या देशाचे त्यांनीच ठेविलें. त्याचाच भावार्थ पुढे काळे लोक काळी पलटण असा झाला.

युरोपखंडांत किती एक राज्ये व संस्थाने आहेत; आणि हा एकटा हिंदुस्थान देशच अर्ध्या युरोपखंडाएवढा आहे. म्हणून या देशास एक देश आहे म्हणणे वास्तविक पाहिले तर योग्य नाही. कारण की, हे खरेच एक मोठे खंड आहे व त्यांत अनेक देश आहेत. एकंदर प्रजा यांत 20 कोटी आहे व विलायतेंत सारी दोन कोटी प्रजा आहे. तेणेकरून विलायतेचे दसपट हा देश मोठा आहे. आतां विलायतेची वसाहत जरी फार दाट आहे, तरी हिंदुस्थानची लांबीरुंदी 15/16 पट त्यापेक्षा अधिक येईल. या देशांत जिकडे तिकडे ब्राम्हणांचा अधिकार, संस्कृत भाषा व धर्म एकसारखा आहे, इतकेच काय तें ऐक्यतेचे चिन्ह आहे. परंतु तसा युरोपखंडांतही सर्वत्र एकच धर्म चालतो. तथापि देश व राज्ये पृथक मानिली जातात व युरोपांतील लोक मोठे पराक्रमी आहेत. अस्तु.

हिंदुस्थानचे दक्षिण भागास चार भाषा आहेत. कानडी, मलबारी, तैलंगी आणि द्राविडी. यांपैकी द्राविडीस 'तामळ' किंवा 'आरवी' असेही म्हणतात. या चारी भाषा एका पद्धतीच्या आहेत. यांमध्ये व मध्य हिंदुस्थानचे भाषेत एक मोठा भेद असा आहे की, मनुष्यजातीखेरीज सर्व पदार्थ नपुंसक लिंगांत जातात. घोडा, घोडी; बैल, गाय यांचा भेद नाही. मनुष्याव्यतिरिक्त बाकी जिवांस त्या भाषांत एकच नपुंसक लिंग समजतात. या चार भाषा सोडून मध्य हिंदुस्थानांत किंवा दक्षिणेकडे आले म्हणजे तेथे सहा भाषा एकाच तऱ्हेच्या आढळतात. 1 मराठी, 2 गुजराथी, 3 मेवाडी, 4 मारवाडी, 5 कच्छी, व 6 सिंदी. नंतर पूर्वेस फिरलें म्हणजे 1 माळवी, 2 रांगडी, 3 ब्रिज, 4 मुलतानी, 5 काश्मिरी व 6 पंजाबी; आणि याचेही पूर्वेस वळल्यावर 1 हिंदी, 2 बंगाली, 3 उडियी, आणि 4 नेपाळी अशा 4 आहेत. या सर्व पूर्वेच्या भाषा एकसारख्या पद्धतीच्या व एकमेकींस जवळजवळ आहेत. एकूण 20 भाषा झाल्या. आता या सर्व भाषा बोलणारे लोक पाहिले तर वेगळ्या स्वभावाचे व वेगळ्या पोषाकाचे आणि वेगवेगळे रीतिभातीचे आहेत. या वीसही जातींचे लोकांत चांगले लोक ब्रिज भाषा बोलणारे हे आहेत. हे स्वरूपानें, स्वाभाविक गुणाने व शौर्यानेही फार चांगले आहेत व इंग्रजी पलटणीत जे बहुतकरून लोक असतात, ते याच प्रदेशांतील. यांचे मनामध्ये कपट नसून मित्रभाव चांगला असतो व प्रसंगी हे आपले जिवाकडेही पाहावयाचे नाहीत, असे हे खरे क्षत्रिय लोक आहेत.

**116. हिंदुस्थानचे प्राचीन संस्कृत नाव काय आहे?**

(1) भरत
(2) हिंदुस्थान
(3) दर्यावर्त भूभाग
(4) आर्यावर्त किंवा भरतखंड

**117. हिंदुस्थान देश केवढा आहे?**

(1) सर्वात मोठा
(2) सर्वात लहान
(3) अर्ध्या युरोपखंडा एवढा
(4) पूर्ण युरोपखंडा एवढा

**118. हिंदुस्थानची प्रजा किती कोटी आहे?**

(1) 10 कोटी (2) 20 कोटी
(3) 30 कोटी (4) 40 कोटी

**119. विलायतेच्या किती पट हा देश मोठा आहे?**

(1) विलायतेच्या नऊपट हा देश मोठा आहे.
(2) विलायतेच्या दसपट हा देश मोठा आहे.
(3) विलायतेच्या पाचपट हा देश मोठा आहे.
(4) सातपट मोठा आहे

**120. द्राविडी भाषेस काय म्हणतात?**

(1) तामळ किंवा आरवी (2) आर्यभाषा किंवा प्राकृत
(3) संस्कृत किंवा कानडी (4) गुजराथी किंवा फार्शी

**खालील उताऱ्यातील प्रश्न क्र. 121 ते 125 ची उत्तरे द्या :**

गांधींसारखे युगप्रवर्तक नेते कुणा महापुरुषाच्या छायेत वाढत नाहीत. स्वतःचे जीवन ते स्वतःच घडवतात. गांधींच्या व्यक्तिमत्त्वावरही कोणतीही परंपरा व संप्रदाय, धर्मग्रंथ किंवा गुरू यांची एकसुरी छाप दिसत नाही. अनेक ग्रंथ आणि संप्रदाय यांच्यामधून त्यांनी काही विचार, प्रेरणा व तत्त्वे आत्मसात केली आणि त्याप्रमाणे वर्तन करण्याची उमेद बाळगली. मात्र, केवळ एखादे पुस्तक वाचून त्यांनी आपले विचार घडविले असे झाले नाही. लौकिक व्यवहाराच्या कसोटीवर त्यांनी प्रत्येक नवी संकल्पना घासून पाहिली. ते म्हणतात, 'जे विचार मी प्रकट केले आहेत ते माझे आहेत आणि माझे नाहीत. ते माझे आहेत कारण की त्याप्रमाणे वर्तन करण्याची मला उमेद आहे, ते जणू माझ्या आत्म्यात घडलेले आहेत. ते माझेच नाहीत, कारण की तसे विचार मीच केले आहेत असे नाही. कित्येक पुस्तके वाचल्यानंतर ते बनले आहेत. मनाच्या आत खोल खोल जे मी पाहत होतो त्याला या पुस्तकांचा आधार मिळाला.''

असा आधार मिळाल्यामुळेच त्यांनी उत्स्फूर्तपणे स्वीकारलेल्या तत्त्वांवरील त्यांच्या श्रद्धेला बळकटी आली. त्यांचा आत्मविश्वास दुणावला. बालपणापासून गांधींनी सत्य हे जीवनातील सर्वश्रेष्ठ मूल्य म्हणून पत्करले होते. 'हे सत्य केवळ वाचेतील नसून त्याला

विचारांचा आधार होता. ते सापेक्ष होते तसे निरपेक्षही होते. असे निरपेक्ष (स्थलकालातीत) सत्य म्हणजे परमेश्वर'. सत्याच्या रूपाने नेहमी परमेश्वराचाच साक्षात्कार होतो अशी त्यांची श्रद्धा होती. सत्यावरील निष्ठा हा त्यांच्या जीवनाचा मुख्य आधार होता. प्रत्येक माणसाच्या हृदयात परमेश्वराचे वास्तव असल्याने स्वत:च्या हृदयातच त्याला सत्याची प्रचीती येते. कितीही हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, कितीही किंमत मोजावी लागली तरी स्वत:ला प्रतीत झालेल्या या सत्याला धरून आचारण करणे ही नीती होय. प्रत्येक माणसाच्या या नैतिक कर्तव्यालाच धर्म असे नाव आहे. स्वत:ला पटलेली ही नीतितत्त्वे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत उतरविण्यासाठी गांधी जन्मभर अविश्रांत धडपडले. म्हणूनच आपल्या आत्मचरित्राला त्यांनी 'सत्याचे प्रयोग' असे नाव दिले आहे.

**121. महात्मा गांधींचे व्यक्तिमत्त्व घडले ते ....... मुळे.**
- (1) हिंदू धर्मग्रंथ अध्ययनाने
- (2) अनेक धर्म-सांप्रदायिक विचारांच्या परिशीलनाने
- (3) त्यांच्या सद्‌गुरूंच्या अनुग्रहाने
- (4) पाश्चिमात्य जगत् भ्रमणामुळे

**122. महात्मा गांधींना ....... म्हटले आहे.**
- (1) महात्मा
- (2) राष्ट्रपिता
- (3) महापुरुष
- (4) युगप्रवर्तक

**123. अयोग्य विधान निवडा.**
- (1) गांधींचे विचार अनेक पुस्तकांच्या वाचनाने बनले.
- (2) गांधींनी सत्य हे जीवनमूल्य स्वीकारले.
- (3) गांधींचे व्यक्तिमत्त्व हे महापुरुषांच्या छायेत विकसित झाले.
- (4) माणसांच्या नैतिक कर्तव्यालाच धर्म म्हणतात.

**124. गांधीजींचे विचार हे 'त्यांचे आहेत आणि त्यांचे नाहीत' म्हणजे**
- (1) त्यांच्या विचाराविषयी ते साशंक आहेत.
- (2) ते विचाराप्रमाणे वागत व त्या विचारांना अनेक पुस्तकात आधार मिळाला.
- (3) ते विचार कुणाच्यातरी प्रेरणेने आहेत.
- (4) गांधींनी ते विचार सांगितले व ते ग्रंथातील आहेत.

**125. या उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.**
- (1) बोले तैसा चाले
- (2) ऐकावे जनाचे करावे मनाचे
- (3) आम्हां घरी धन
- (4) व्यक्ती तितक्या प्रकृती

**खालील उत्तारा वाचून प्रश्न क्र. 126 ते 130 या प्रश्नांची उत्तरे द्या.**

श्रीमंताचा व गरिबाचा या जगांत दूरचा संबंध आहे. तरी परलोकामध्ये फार जवळचा संबंध आहे. याकरितां दया हा आपला एकामेकांचा प्रथम धर्म आहे. सर्व धर्माचें सार दया आहे. गरीब हा श्रीमंताचे जुलमाने होतो. काही जन्मत: कोणी गरीब नसतो. याकरितां सर्वांवर दया करावी, हा उत्तम मार्ग. सर्वदा न्याय दयेच्या अनुसंगाने करावा. आणि असें मनांत वागवावें की, आम्ही मरणानंतर ईश्वरापाशीं दया मागू. त्याचे दयेवांचून आमचा परिणाम लागणार नाही. म्हणून जर आपण दुसऱ्यापाशी दया मागण्यास सिद्ध आहों तर तसेंच आपण करून दाखविले पाहिजे. तरच आपले मागणे पसंत होईल. सर्व जीवजंतु ज्ञात अज्ञात हे दयेस पात्र आहेत. परंतु हिंदू धर्मात यज्ञादिक निर्दय कर्मे आहेत, ती ईश्वरापासून झाली असतील, असे मला वाटत नाही. दुसऱ्या जनावरांवर आपलें पाप ठेवून त्याजला मारावें. म्हणजे त्याचे दुःखानें आपलें पाप जाईल ही गोष्ट विचारास विरुद्ध आहे. परंतु याप्रमाणे चाल बहुत दिवसांपासून आहे. ज्याकाळी ईश्वराने माणसें निर्माण केली, त्याकाळी ती अमक्याच कारणाकरितां केली, असें पक्कें समजत नाही. परंतु अमुक रीतीनें चालावें व अमुक रीतीनें न चालावें हे ईश्वराने प्रत्येक माणसाचे बुद्धीत पेरिलें आहे, हे खचित आहे. ईश्वराने आपली बढाई वाढवावी म्हणून माणसे केली, असे नाही. ईश्वरास माणसाच्या कीर्तनाने अधिक थोरपणा येतो, हे मिथ्या आहे. तथापि मनुष्यांनी जो आपला निर्माणकर्ता असेल त्याची सेवा करावी हाच धर्म योग्य आहे. व नीतीने वागावें म्हणजे सुख होते. परंतु यज्ञ करण्यास सांगितले असेल, असे वाटत नाही. यज्ञ करणे हे अनुचित व अविचारी कर्म आहे. हे बहुधा मनुष्यांनी योजिलें असावें. प्रथम मला वाटतें ईश्वराने इतकाच धर्म लावून दिला असेल की, त्यांनी चांगली वर्तणूक करावी, आणि ईश्वरावर भार ठेवून वागावें. एवढाच धर्म होता. हे अशावरून वाटते की, इतर धर्म सर्व माणसांस लागू पडत नाहीत. जर इंग्रजांचा धर्म खरा म्हणावा तर आलीकडे उत्पन्न झाला. तेव्हां त्याचे मागें ते ज्या देशांत तो धर्म माहित पडला नाही, त्या देशांतील माणसें नर्कात गेली की काय? हे बरोबर नाही. तशीच मुसलमानाचे धर्माची अवस्था आहे. ईश्वरप्रेरित धर्म सर्वास सारखा कळावा. जशी त्याणे लोकांस खाण्यापिण्याची सोय करून दिली, तद्वत धर्माचीही तयारी केली असेल, व जर जनावरांचे यज्ञ हा धर्म म्हणावा, तर त्याविषयीही ऐक्यता होणार नाही. व जनावरें वेगळाली प्रत्येक देशांत आहेत. तेव्हा त्यांपैकी कोणत्या जनावराच्या रक्ताने ईश्वर संतुष्ट होतो तेंही बरोबर कळत नाही.

**126. सर्व धर्माचे सार काय आहे?**
- (1) प्रभू
- (2) देव
- (3) धर्म
- (4) दया

**127. सर्व जीवजंतू ज्ञात अज्ञात कशास पात्र आहेत?**
- (1) शरणागती
- (2) गतिमानतेस
- (3) दयेस
- (4) अधोगतीस

**128. ईश्वरास माणसाच्या कीर्तनाने अधिक थोरपणा येतो, हे मत कसे आहे?**
- (1) खरे
- (2) मिथ्या
- (3) बरोबर
- (4) चूक

**129. योग्य धर्म कोणता?**
(1) जो आपला निर्माणकर्ता असेल, त्याची सेवा करावी
(2) जो नवसास लगेच पावतो तो
(3) जो धर्म सर्व धर्मांची शिकवण देतो
(4) ज्यामध्ये भरपूर व्रतवैकल्ये सांगितली आहेत

**130. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.**
(1) प्रेम (2) माया (3) दया (4) पूजा

**131. Fill in the blank choosing the correct alternative: Newton ......... that the force of gravitation makes apples fall.**
(1) invented (2) intercepted
(3) discovered (4) deplored

**132. From the following group of words choose the mis-spelt word(s).**
a. transendent
b. tyranny
c. tendancy
d. privilege
**Answer Option :**
(1) 'a' and 'd' only (2) 'a' and 'c' only
(3) 'b' only (4) 'b' and 'c' only

**133. He is so old that he cannot walk.**
**Which of the following option is correctly converted from the above complex sentence into a simple sentence?**
(1) He is very much old that he could not walk.
(2) He can't walk because he was so old.
(3) He is too old to walk.
(4) He is to old too walk.

**134. Give a single word for 'a school for infants and young children'.**
(1) infantile (2) infirmary
(3) creche (4) nursery

**135. Choose the correct article from the following alternatives and fill in the blank.**
(1) An (2) A
(3) The (4) No article

**136. Choose the correct word to complete the following sentence meaningfully.**
**The play ....... at eight O'clock.**
(1) ended (2) stopped
(3) exited (4) finished

**137. Choose the correct option and fill in the blank :**
**A person who is a hundred or more years old is called ....... .**
(1) Centurian (2) Centenarian
(3) Octogenarian (4) Centurion

**138. Choose a word to complete the following sentence meaningfully.**
**His English is almost ....... .**
(1) unintelligible (2) complicated
(3) obscure (4) excited

**139. Fill in the blank with the correct option:**
**People who watch a match or a show are called-**
(1) Spectacles (2) Speculators
(3) Spectators (4) Senators

**140. Choose the correct meaning of the idiom underlined in the following sentence.**
**The trade union's seemingly rightful demand is only a stalking horse to blackmail the management.**
(1) proposal (2) suggestion
(3) trick (4) pretence

**141. Fill in the blank with the correct adjective from the options given below:**
**Chennai is ....... from Delhi than Calcutta.**
(1) further (2) farther
(3) father (4) far more

**142. Choose the correct meaning of the idiom underlined in the following sentence.**
**Meena is not highly qualified but she has the gift of the gab.**
(1) a good personality
(2) art of speaking
(3) a political foresight
(4) an interest in discipline

**143. Choose the correct alternative to change the voice. People have seen wolves in the streets.**
(1) People have been seen by wolves in the streets.
(2) People are being seen by wolves in the streets.
(3) Wolves are being seen by people in the streets.
(4) Wolves have been seen by people in the streets.

**144. Identify the correct meaning of the phrase underlined in the following sentence.**
**The miners are coming out again next week.**
(1) appear (2) result
(3) strike (4) blossom

**145. Choose the correct alternative where, the following sentence is rewritten using it:**
**To live without air is impossible.**
(1) To live without air, impossible it is.
(2) Is it impossible to live without air ?
(3) It is possible to live without air.
(4) It is impossible to live without air.

The UNIQUE academy

**146. Choose the word which is a synonym to the underlined word.**
**The perpetual noise made it impossible for them to concentrate on the problems.**
(1) unlimited (2) irritating
(3) everlasting (4) occasional

**147. Fill in the blank with the correct preposition from the options given below:**
**They shall finish the construction ....... a week.**
(1) on (2) from
(3) in (4) upon

**148. Two homonyms are underlined in the following sentences which may be either mis-spelt or inappropriate in the context of the sentence. Read the sentences and state whether they are correct or otherwise.**
a. Painting is done on canvass.
b. He was canvassing for votes.
**Answer Option :**
(1) only 'a' is correct
(2) only 'b' is correct
(3) 'a' and 'b' are correct
(4) 'a' and 'b' are incorrect

**149. Choose the correct option where in the following sentence is rewritten using 'too':**
**It is very cold we cannot go out.**
(1) As it is very cold we too cannot go out.
(2) It is too cold for us to go out.
(3) It is too cold that we cannot go out.
(4) It is too cold that we can go out.

**150. Complete the following sentence choosing the correct alternative.**
**Allegory means ........**
(1) An animal story with a moral.
(2) A story of detached incident.
(3) A short story with a moral.
(4) A story in which the characters represent moral or spiritual ideas.

**151. Rewrite the sentence using 'no sooner ..... than':**
**As soon as he reached the station, the train whistled off.**
(1) No sooner than he reached the station, the train whistled off.
(2) No sooner did he reach the station than the train whistled off.
(3) No sooner the train whistled off, than he reached the station.
(4) As soon as he reached the station, no sooner than the train whistled off.

**152. Which statement is correct?**
A. He has a flair for music.
B. The matter got flared up
**Answer Option :**
(1) A is right B is not.
(2) B is right A is not
(3) Both A and B are right
(4) Both - and B are incorrect

**153. Change the following sentence into interrogative sentence :**
**A dog cannot change its nature.**
(1) When a dog can change its nature?
(2) Should a dog change its nature ?
(3) Can a dog change its nature?
(4) How a dog can change its nature?

**154. Identify the correct indirect narration of the following sentence :**
**What shall I say, mother? she said.**
(1) She asked her mother what she should say.
(2) She asked her mother whether she should say.
(3) She asked what she should say to mother.
(4) She asked her mother that what she should have said.

**155. Fill in the blank choosing the correct option:**
**....... science is a good servant, it is a bad master.**
(1) But (2) The (3) Though (4) For

**156. Which statement is correct?**
A. I spent the holidays with my family members.
B. I spent the holidays with my family.
C. I spent the holidays with the members of my family.
**Answer Option :**
(1) Only A (2) Only B
(3) Only C (4) B and C

**157. Fill in the blank with the correct option:**
**In ancient times, the earth was considered to be.....**
(1) Stationery (2) Stationary
(3) Stationed (4) None of the above

**158. Choose the correct sequence of the following parts which are labelled ABCDE so as to produce a meaningful and correct sentence.**
1. at about five - (A) 2. in the morning - (B)
3. would reach - (C) 4. the train - (D)
5. Deoli - (E)
**Answer Option :**
(1) BACDE (2) DCEAB
(3) DCABE (4) ABECD

**159. Fill in the blank with the correct option :**
**That which is not likely to happen is called.....**
(1) Impoverish (2) Improbable
(3) Imperceptible (4) Impregnable

**160. Choose the correct antonym for the following word: 'Frugal**
(1) Extravagant (2) Fragile
(3) Miserly (4) Fictitious

**161. Choose the correct meaning for the word 'wretched'.**
(1) Deplorable (2) Diligent
(3) Doubtful (4) Difficult

**162. I must have my way in this matter.**
**The meaning of must in the above sentence is.....**
(1) necessity (2) obligation
(3) fixed determination (4) strong probability

**163. Fill in the blank with the correct adjective:**
**It is not easy to find a ..... baby sitter.**
(1) reliance (2) reliant
(3) reliable (4) relevant

**164. Identify the mood expressed in the following sentence :**
**I wish I knew her native place.**
(1) ardent desire
(2) improbable supposition
(3) purpose of action
(4) imagination

**165. Rewrite the following sentence using 'neither ..... nor':**
**I don't have a pen or a pencil.**
(1) I don't neither have a pen nor a pencil.
(2) Don't I have neither a pen nor a pencil?
(3) I have neither a pen nor a pencil.
(4) I have neither nor a pen or a pencil.

**166. Which pair among the following is not correctly matched?**
(1) Tigers - roar (2) Ducks - quack
(3) Frogs - crow (4) Monkeys - chatter

**167. Choose the correct article from the following options :**
**He wants to become ....... actor.**
(1) a (2) an
(3) the (4) No article

**168. Find out the correct form of pronoun of the underlined word.**
**He himself told me about you.**
(1) Reflexive (2) Emphatic
(3) Relative (4) Demonstrative

**169. Join the sentences using 'not only .... but also':**
**He was a statesman. He was a poet.**
(1) Not only he was a statesman but also he was a poet.
(2) He was not only a statesman but also a poet.
(3) He was but also a poet not only was he a statesman.
(4) He was not only but also both a statesman and a poet.

**170. Which of the following statements is correct?**
A . Both did not go.
B. Neither went.
**Answer Option :**
(1) A is correct B is not
(2) B is correct A is not
(3) Both A and B are correct
(4) Neither A nor B is correct

**171. Fill in the blank with the correct option:**
**........ I have a word with you?**
(1) Was (2) Could
(3) If (4) Am

**172. Complete the sentence using correct form of verb.**
**If you ....... a barrier, you succeed in forcing your way through it.**
(1) break into (2) break through
(3) break up (4) break with

**173. Identify the meaning expressed through the conjection 'that' in the following sentence.**
**He was so tired that he could scarcely stand.**
(1) purpose (2) consequence
(3) wish (4) none of these

**174. Which statement among the following is correct?**
A. He held the book in the both hands.
B. He held the book in both hands.
C. He held the book in both his hands.
**Answer Option :**
(1) Only A (2) Only B
(3) Only C (4) B and C

**175. Complete the following sentence using the correct form of verb:**
**I.....(write) letters since ten o'clock this morning.**
(1) wrote
(2) have been writing
(3) was writing
(4) had been writing

**176. Fill in the blank with the correct option :**
**We rise.....the Sun on every Sunday.**
(1) beside (2) up
(3) over (4) with

The UNIQUE academy

**177. Mark the incorrect sentence from the following.**

a. He is taking a lunch.
b. Shakespeare was the greatest dramatist.
c. We should help the poor.
d. Mumbai is a capital of Maharashtra.

(1) 'a' only (2) b' and 'c' only
(3) 'd' only (4) 'a' and 'd' only

**178. Fill in the blank with the correct noun:**

(1) histology (2) hospitalizity
(3) hospitality (4) hostility

**179. Which statement is correct?**

**A. He is wiser than I.**
**B. I with some friends went for a walk.**

(1) A is correct B is not
(2) B is correct A is not
(3) Both A and B are correct
(4) Neither A nor B is correct

**180. Fill in the blank with the appropriate relative pronoun:**

**The moment ..... is lost is lost for ever.**

(1) those (2) who (3) what (4) which

**181. Find out which part of the sentence has an error. If there is no mistake, the answer is 'no error.**

| You are | Wiser | than old | No. Error |
|---|---|---|---|
| a | b | c | d |

(1) a (2) b (3) c (4) d

**182. Fill in the blank with the correct option :**
**A friend bought the car for,**

(1) mine (2) hers (3) us (4) we

**183. Pick out the sentence which is appropriately punctuated.**

(1) He said: A mother is more than the Earth.
(2) He said, 'A mother is more than the Earth.'
(3) He said, "A mother is more than the earth."
(4) He said; A mother is more than the earth.

**184. Choose the correct alternative to combine the following sentences using 'except':**
**She speaks fast. Otherwise she is a good teacher.**

(1) She speaks fast except is she a good teacher
(2) Except that she speaks fast, she is a good teacher.
(3) Except she is a good teacher she speaks fast.
(4) She speaks except that fast but she is a good teacher.

**185. Choose the correct conjunction to fill in the blank:**
**The boy was punished ..... he had broken the cup.**

(1) So (2) but
(3) because (4) therefore

**Questions 186 - 190 :**

**Read the following passage carefully and answer the questions that follow :**

The scenario is frightening: Scientists predict that several low-lying island nations would be wiped out from the face of the earth!

The gradual warming of the earth could lead to rise in the sea level and render some of the low-lying islands uninhabitable. If the sea level rises by about two metres, which some scientists say it could, islands like the Maldives could simply disappear.

Thousands of Maldivians, including school children, took out a rally in Maldiv recently to demonstrate their concern. The rally was held to coincide with a government meeting called to debate what action the world needs to take to protect the island nations from the impending catastrophe. Environment Ministers of 15 small island nations called upon the industrialised nations to make available resources and technology to the most vulnerable states to help them meet the challenge.

The gases that cause global warming are produced mainly by the rich countries. But the poor countries with their large populations, low incomes and fragile agriculture could suffer more than the rich ones if the world warms and sea level rises.

**186. The low-lying islands may become uninhabitable because of**

(1) Fall in sea level
(2) Rise in sea level
(3) Environment Ministers
(4) Rally in Maldives

**187. What is the impending catastrophe?**

(1) global warming (2) lack of technology
(3) lack of resources (4) poverty

**188. Who would suffer the most if the world warms and sea-level rises?**

(1) Rich countries
(2) Environment Ministers
(3) Industrialised nations
(4) Poor countries in low-lying islands

**189. The rich countries should take the moral responsibility for the environmental dangers faced by small island nations because**

(1) the rich countries are at high sea level.
(2) the poor countries are below sea level.
(3) the rich industrialised countries produce gases that cause global warming.
(4) the rich countries do not have large population.

The UNIQUE academy

**190. Choose the correct meaning of the word 'uninhabitable'.**
(1) unsuitable for living in
(2) suitable for living in
(3) not habitual
(4) habitual

**Q. No. 191 - 195 : Read the following passage and answer the items that follow.**

Your answers to these items should be based on the passage only.

Amnesty International's charge that 'tens of thousands' of political prisoners, including prisoners of conscience, are languishing in Indian jails and that prisoners are routinely tortured in this country has to be seen in a much wider context than the organisation's annual report cares to do. In its overall appraisal of 151 countries, Amnesty has accused 112 of torturing prisoners, 63 of harbouring prisoners of conscience, 61 of resorting to political killings and 53 of detaining people without a trial. Of these apparently overlapping categories, India seems to have been excluded from the list of the 61 which undertake political killings. The report has however, pointed out that scores of people in India die of torture in police and military custody and that many also simply disappear. Clearly, only a thin line separates the 61 charged with political murder from the rest. Before coming to such conclusions, however, it may also be necessary to classify the various countries according to their political systems. Torture by the security forces and killings at the behest of the government make no difference to the victims whether they are in a democratic country or a totalitarian one. It is also nobody's case that a democratic country is less culpable than a dictatorship in the event of human rights violations. But the point perhaps still needs to be made that torture or 'disappearances' represent a failure of the system in a democracy in contrast to being an integral part of state policy in a country ruled by an autocrat who is answerable to no one.

India may be guilty of keeping tens of thousands' behind bars and of the other human rights abuses mentioned by Amnesty, but it still remains a qualitatively different place from a totalitarian country. It is in this respect that Amnesty has been less than fair. It has chosen to ignore the distinctions between the good, the bad and the ugly. The openness of Indian society will be evident to anyone who spends half an hour in one of its chaotic market places or visits the law courts or watches a political rally or reads a newspaper or strikes up a conversation with any person on the roads. There is no sense of fear in India, as in a dictatorship. There is also scope for securing relief from the heavy-handed behaviour of the authorities, even if the human rights commission has not yet lived up to expectations. Unless such points are recognised, Amnesty's assessment will seem to be a dry recital of statistics which may *pillory* India simply because of its larger population. Mercifully, Amnesty nowadays at least notes that the terrorists also indulge in human rights violations and that India has to cope with several insurgencies *fomented* by a country where the military does not always seem to be under the control of the elected government. True, there is much that is wrong in India's prison system and with the way the terrorist challenge is sometimes met, but the stress should be on activating the self-correcting mechanism within a democracy and not merely on painting a grim, even biased, picture.

**191. According to the passage**
a. India is guilty of some human rights abuses.
b. 'Amnesty International appraised all the democratic countries.
c. There is an overlapping of cases in the categories of human rights abuses.
d. The report notes that the terrorists also violate human rights.

**Which of the statements given above are not true?**
(1) 'a' and 'b' only (2) 'd' and 'd' only
(3) 'a' and 'c' only (4) 'b' only

**192. The author of the passage :**
a. agrees with the report
b. disagrees with the report
c. supports the totalitarian approach
d. disagrees with report on terrorists

**Answer option :**
(1) 'a' and 'c' only (2) 'b' only
(3) 'b' and 'd' only (4) 'c' only

**193. Main purpose of writing this passage seems**
a. To condemn political killings.
b. To highlight the role of Amnesty International.
c. To highlight the sufferings of prisoners.
d. To condemn the political masters

**Answer option :**
(1) 'a' only (2) 'b' and 'c' only
(3) 'c' only (4) 'c' and 'd' only

**194. According to the passage :**
a. There is a need to check political killings in India.
b. Human Rights Commission has done commendable service.
c. There is a need to improve India's prison system'.
d. India is 'not at all guilty' of human rights violation

**Which of the statements given above are correct?**

(1) 'a' and 'b' only (2) 'b' and 'c' only
(3) 'c' only (4) 'c' and 'd' only

**195. Choose the word which is most nearly the same in meaning as the given word as used in the passage.**

**FOMENTED**

(1) suppressed (2) faced
(3) formed (4) instigated

**Q. No. 196-200: Read the passage carefully and answer the questions given below it :**

On August 15, 1947, India was granted independence from British colonial dominance. This was an event of international significance. From this day onwards, the Indian Union assumed a role in world politics that was appropriate enough to modify the thinking of nations. *Concepts* like non-alignment, tolerance, non-violence and peaceful *co-existence* were introduced by India into the international vocabulary.

Our dreams concern India, said the first Prime Minister of the country, Pt. Jawaharlal Nehru, on the eve of achieving freedom, "but they also concern the whole world, for the world has become one."

Mahatma Gandhi chose Nehru to become the first PM² of independent India. With his vision of unity of the nation, he became the architect of modern India. It was to be a federal state based on *secularism* - the commitment to an Indian identity, which was above all races, castes, and religions. It was a vision of extraordinary dimensions.

Both Nehru as well as his daughter and successor, Smt. Indira Gandhi, were well aware that only a firm anchorage in the Indian identity could unite the nation and enable it to make an impact on the world. In these days of mutual interdependence, the western powers and America cannot afford to ignore what is happening in this region. It is possible that the fate of the Asian democracies would one day be decided on the banks of the Ganges. If India fails to remain a democracy, this would *trigger* the fall of the whole of South and South-East Asia. That is why the Indian Prime Minister has to play a role that goes well beyond duties related to internal affairs only. It is of international political significance.

**196. What made Pt. Jawaharlal Nehru the architect of Modern India?**

(1) He secured independence for India.
(2) His vision of the unity of the nation
(3) Because he was the first Prime Minister of India
(4) He wanted India to make an impact on the world.

**197. Which of the following concepts have been introduced by India into the international vocabulary?**

a. Mutual interdependence and democracy
b. Non-alignment and tolerance
c. Non-violence and peaceful co-existence

**Answer option :**

(1) 'a' and 'c' only (2) 'a' and 'b' only
(3) 'b' and 'c' only (4) all the above

**198. Which word in this passage is used to describe the phrase "to live together with mutual tolerance?"**

(1) non-alignment (2) co-existence
(3) secularism (4) anchorage

**199. Select the word that is as nearly opposite in meaning to 'dominance' used in this passage.**

(1) government (2) rule
(3) subordination (4) importance

**200. Why does the role of the Indian Prime Minister go beyond the duties related to internal affairs of the country?**

(1) To create an impact on foreign countries
(2) Because happenings in India influence politics and democracies of South and South-east Asia
(3) To avoid interference of America and other big powers
(4) None of these

The Unique Academy

# ASO - मुख्य परीक्षा 2012 उत्तरे
## मराठी-इंग्रजी

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 1 | 3 | 4 | 3 | 4 | 3 | 2 | 3 | 3 |
| 11 | 1 | 1 | 1 | 3 | 2 | 4 | 2 | 2 | 4 | 1 |
| 21 | 2 | 1 | 3 | 1 | 3 | 1 | 4 | 3 | # | # |
| 31 | 4 | 4 | 1 | 1 | 2 | 3 | 1 | 2 | 1 | 2 |
| 41 | 1 | 3 | 3 | 1 | 1 | 3 | 1 | # | 3 | 1 |
| 51 | 4 | 4 | 2 | 1 | 2 | 3 | 2 | 3 | 4 | 3 |
| 61 | 2 | 4 | 4 | 3 | 1 | # | 3 | 2 | 2 | 1 |
| 71 | 3 | 3 | 1 | 4 | 3 | 2 | 1 | 2 | 3 | 3 |
| 81 | 1 | 3 | 3 | 2 | 1 | 4 | 3 | 4 | 1 | 3 |
| 91 | 3 | 1 | 2 | 2 | 3 | 2 | 1 | 1 | 3 | 4 |
| 101 | 1 | # | 3 | 1 | 1 | 4 | 4 | 4 | 2 | 2 |
| 111 | 2 | 4 | 2 | 3 | 1 | 4 | 3 | 2 | 2 | 1 |
| 121 | 2 | 4 | 3 | 2 | 1 | 4 | 3 | 2 | 1 | 3 |
| 131 | 3 | 2 | 3 | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 3 | 4 |
| 141 | 2 | 2 | 4 | 3 | 4 | 3 | 3 | 4 | 2 | 4 |
| 151 | 2 | 3 | 3 | 1 | 3 | 4 | 2 | 2 | 2 | 1 |
| 161 | 1 | 3 | 3 | 1 | 3 | 3 | 2 | 2 | 2 | 2 |
| 171 | 2 | 2 | 2 | 4 | 2 | 4 | 4 | 3 | 1 | 4 |
| 181 | 2 | 3 | 3 | 2 | 3 | 2 | 1 | 4 | 3 | 1 |
| 191 | 4 | 2 | 3 | 3 | 4 | 2 | 3 | 3 | 3 | 2 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.